HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सोलापूर जिल्ह्यातील महिलांचे योगदान



**Reshma Maruti Bhagat**
**M.A.,B.Ed., NET (History)**

की वर्ड्स -स्वातंत्र्य, चळवळ, सोलापूर,महिला, योगदान

## प्रस्तावना -

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा अभ्यास करीत असता सर्व घटकांचा सर्वांगिण अभ्यास होणे गरजेचे आहे. त्यामुळेच स्थानिक इतिहास लेखनाची गरज निर्माण झाली. स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून इतिहासाच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकता येतो. त्या पध्दतीने सोलापूरच्या स्वातंत्र्य संग्रामामधील स्त्रियांच्या योगदानाचा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो. सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यसंग्रामातील प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीमागे पाठीमागे त्यांच्या पत्नींचा खुप मोठा वाटा असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर घरातील व्यक्तीचा आदर्श समोर ठेवून अनेक स्त्रियांनी स्वातंत्र्यसंग्रामामध्ये सहभाग घेतल्याचे दिसून येते. पुरुषांवरोवर स्त्रियांचाही समावेश मोठ्या प्रमाणामध्येहोता. असंख्य स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला होता. स्वातंत्र्यवीरांच्या जेवण्याची सोय करण्याचे काम, बातम्या पुरवण्याचे काम, वेळप्रसंगीहातामध्येशस्त्र घेऊन लढण्याचे कार्येही स्त्रियांनी केलेली आहेत. परंतु स्वातंत्र्य लढ्याच्या मवाळ आणि जहाल युगापेक्षा गांधी युगात स्त्रियांचा चळवळीतील सहभाग वाढला. तो अचंबित करणारा होता. 'टिळक फंड निधी संकलना'साठी महात्मा गांधीजींनी दिलेली भेटही या परिसरातील स्त्रियांच्या स्वातंत्र्यलढ्यातील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभागास प्रेरणा प्रेरणा देणारी ठरली.सविनय कायदेभंग चळवळ, असहकार आंदोलन, 'भारत छोडो' आंदोलनात सोलापूर परिसरातील स्त्रियांचा सहभाग महत्वाचा होता.

सोलापूर जिल्ह्यातील महिलांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग नोंदवत मोठा त्याग केला आहे. विशेषतः १९३०-३२ च्या सविनय कायदेभंग चळवळीत आणि १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात महिलांनी खादी प्रचार, दारूबंदी, प्रभातफेरी आणि न्यायालयीन कामात भाग घेतला. महाराष्ट्रातील स्त्रिया खूप धाडसी होत्या होत्या आणि आहेतही. त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत क्रांतीचा अंगार फुलवला.त्यांनी स्वातंत्र्यसैनिकां भोवती सुरक्षिततेचे कवच उभा केले. भारताच्यास्वातंत्र्य चळवळीत क्रांतीकारकां बरोबरच स्त्रियांनी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे.

### उद्देश -

1. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतीलसोलापूर जिल्हयातील स्त्रियांच्या सहभागाचा अभ्यास करणे.
2. स्वातंत्र्य चळवळीत सोलापूर जिल्हयातील स्त्रियांचे कार्य समाजासमोर आणणे.

### गृहितके -

1. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सोलापूर जिल्हयातील स्त्रियांचा सहभाग दिसून येतो.
2. स्वातंत्र्य चळवळीत सोलापूर जिल्हयातील स्त्रियांचे कार्य मोठे आहे.

### संशोधन पध्दती -

प्रस्तूतशोध निबंधासाठी विश्लेषणात्मक ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असून या सदर विषयाशी निगडीत शोध निबंधातील विवेचन दुय्यम् स्त्रोतांवर अवलंबून आहे. यासाठी ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ , स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश वर्तमानपत्रातील लेख, मासिके' यांचा आधार घेतला आहे.

### विविध सत्याग्रह आणि महिलांचासहभाग

### सत्याग्रहात सहभाग नोंदवणे -

श्रीमती रमाबाई पित्रेयांनी१९३२ साली स्वातंत्र्याविषयी भाषण करून आपली भूमिका मांडली व सत्याग्रहात सहभाग नोंदविला . त्या सोलापूरच्या पहिल्या सत्याग्रही म्हणूनओळखल्या जातात. सत्याग्रहामध्ये सहभाग नोंदविलाम्हणून त्यांना २ वर्षाचा कारावास व ५० रू. दंड भरावा लागला. कोर्टात त्यांनाया गुन्ह्याचा जाब विचारला असता रमाबाईंनी उत्तर दिले की "देशाच्या हितासाठी काही केल्यास तो गुन्हा होतो का?" ह्यामुळे ह्यामुळे त्यांना कारावासात आणखी 50 दिवस रहावे लागले. जेलमध्ये असतानासूध्दा त्यांनी प्रभात फेरी, भाषणे, देशभक्तीची गाणी असा कार्यक्रम सुरूच ठेवला. . या कार्याबरोबरच १९३५ साली सोलापूरातील नव्या पेठेत हॉस्पिटल काढून रूग्णांची सेवाही करीत असत .पण या कार्यापेक्षा देशकार्य त्यांना महत्वपूर्ण वाटत होते.यांच्याप्रमाणेचश्रीमती द्वारकाबाई देशपांडे या भारताच्या मुक्तिसंग्रामात भाग घेणा-या प्रमुख महिला कॉंग्रेस कॉंग्रेस कार्यकर्त्या होत्या. द्वारका बाईंनी १९३५ पासून कॉंग्रेसचे सभासदत्व पत्करलेहोते .

### 1930 चार मार्शल लॉ -

१९३० साली सोलापूरात मार्शल लॉ पुकारण्यात आला त्यावेळी स्त्री पुरूष घराबाहेर पडत नसत. ब्रिटिशांच्या बंदुकीला बळी पडू या भितीने घरी लपून बसत. अशा दहशतीच्या वातारणात १८-२० वर्षाच्या पद्मश्री पंडिता सुमतीबाई शहा अतुलनीय धैर्यानेराष्ट्रीय ध्वज घेऊन निघाल्या. क्रांतीसाठी स्त्री-पुरूषांना आवाहन करूनमिरवणुका काढल्या. त्यांनी वयाच्या १९ व्या वर्षी निराधार मुली व स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी सोलापूर या ठिकाणी श्राविकाश्रमाचे कार्य सूरू केले.

### चलेजाव चळवळ -

श्रीमती द्वारका बाई देशपांडे या भारताच्या मुक्तिसंग्रामात भाग घेणाऱ्या प्रमुख महिला कॉंग्रेस कार्यकर्त्या होत्या. द्वारकाबाईंनी १९३५ पासून कॉंग्रेसचे सभासदत्व पत्करून महात्मा गांधीच्या सत्याग्रहाच्या मोहिमेत सामिल झाल्या. १९४२ मध्ये सुरू झालेल्या चले जाव चळवळीमध्ये त्या प्रभावीपणे सहभागी झाल्या. त्यामुळे त्यांना ८ महिन्यांची सजा झाली.

### मीठसत्याग्रह -

पद्मश्री पंडिता सुमतीबाई शहायांनी मिठाचा सत्याग्रह केला व त्या भूमिगतही झाल्या. त्यांत महात्मा गांधीजीचे पत्र आले. त्यातून प्रेरणा घेऊन सोलापूरातील "कस्तुरबा ट्रस्ट" च्या सुमती बाई अध्यक्षा झाल्या.

### झेंडा सत्याग्रह -

श्रीमती द्वारकाबाई देशपांडेयांनी २६ जानेवारी १९४३ या पवित्र दिवशी तुरूंगात असतानाही इतर १२ महिला कैदयांच्या समवेत तुरूंगाच्या दरवाजावर त्यांनी तिरंगा ध्वज फडकविला. विख्यात कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिक, नेते व सोलापूरचे तपस्वी डॉक्टर कृ. भी. अंत्रोळीकर यांच्या पत्नीइंदिराबाई कृष्णाजीपंत अंत्रोळीकरयाआहेत.पती देशभक्त असल्यानेसौ. इंदिराबाईयांनासमाजसेवेच्या कार्यास सदैव प्रोत्साहनच मिळत गेले. डॉ. अंत्रोळीकरांगा स्वातंत्र्यसंग्रामामध्ये राजकीय कैदी म्हणून जेलमध्ये जावे लागले. त्यावेळी त्यांचे सामाजिक कार्य अत्यंत प्रभावीपणे केले. १९३० साली झेंडा सत्याग्रहाचेवेळी महिलांची मिरवणूक निघाली होती त्या सत्याग्रहात इंदिराबाईंनी उत्साहाने सहभाग घेतला.

### बहिष्कार चळवळ -

चंदुलाल शहा यांची बहीण हिराबाई कस्तुरचंद गांधी यांना बालपणापासूनच स्वतंत्र चळवळीचे बाळकडू मिळाले होते. विवाह नंतरही त्यांनी आपल्या देशभक्ती मध्ये खंड पडू दिला नाही .स्वातंत्र्यसंग्रामामध्ये स्वदेशी मालावर बहिष्कार या चळवळीत त्यांनी सहभाग घेतला. तसेच दारूबंदी चळवळ, भूमिगत राहणे, क्रांतिकारकांना मदत करणे, कॉंग्रेसचे क्रियाशील सभासदत्व स्वीकारणे अशा अनेक प्रकारचे कार्य हिराबाई गांधी यांनी केले आणिअशाप्रकारे त्या सतत स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी होत्या.

### गिरणी आंदोलन -

सोलापूरच्या "संग्रामदेवता" म्हणून ज्यांचा गौरव झाला अशा या निलव्वाबाई धनशेट्टी. वयाच्या ५ व्या वर्षी मलप्पा धनशेट्टी यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. मलप्पा धाशेट्टी यांना स्वातंत्र्यसंग्रामामध्ये सहभाग नोंदविल्याबद्दल फाशी झाली त्यावेळी त्याचे वय कमीच होते. परंतु पतीचा देशसेवेचा वसा त्यांनी पुढे संपूर्ण आयुष्यभर सांभाळला. १९४२ च्या क्रांतीकारी लढ्यापासून १९७३ या त्यांच्या मृत्यू वर्षापर्यंत त्यांनी अन्यायाविरुध्द आवाज उठविण्याचे कार्य केले. १९५१ साली जुनी गिरणी बंद पडल्याने हजारो स्त्री-पुरूषांवर बेकारीचे संकट ओढवले. ते निवारण करण्यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी उपोषण केले. व स्पष्ट आश्वासनानंतर उपोषण सोडले.

### स्वातंत्र्य सैनिकांना प्रेरणा देणे -

सोलापूरच्या स्वातंत्र्यसैनिंकामध्ये ज्यांनी अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले त्या तुळशीदास जाधव यांच्या सुविध्य पत्नीम्हणजे जनाबाई तुळशीदास जाधव होय. प्रत्येक यशस्वी पुरूषांच्या पाठीमागे एका स्त्रीचा वाटा खूप महत्वपूर्ण ठरतो. त्याप्रमाणे तुळशीदास जाधव यांच्या कार्यामध्ये जनाबाईंचा खूप मोठा वाटा आहे. वयाच्या विसाव्या वर्षी यांचा विवाह झाला. स्वातंत्र्य लढयामध्ये तुळशीदास जाधवांना सतत तुरूंगवास पत्करावा लागत असे त्यावेळी जनाबाईंनी आपले घर अत्यंत व्यवस्थितपणे सांभाळले. तुळशीदास जाधव यांच्या गैरहजरीत त्यांनी व्यवस्थितपणे संसार सांभाळला म्हणून तर जाधव स्वातंत्र्यचळवळ अत्यंत जोमात

भाग घेऊ शकले.काही काही माणसांचे असेच असते, चंदेरी प्रकाशांचा त्यांत कधीही स्पर्श नसतो, तसा हव्यासही नसतो. जबाबदाऱ्या पार पाडणे एवढेच त्यांना ठाऊक असते.यांच्यासारख्याच डॉ. वीणा पन्नालाल सुराणा या सोलापूर जिल्ह्यातील बार्शी या तालुक्याच्या गावातील निष्णांत डॉक्टर व समाजसेविका होय. २० मे १९३३ मध्ये जन्मलेल्या वीणा या प्रसिध्द समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांच्याबरोबर नोंदणी पध्दतीने विवाह केला आणि तेव्हापासून पन्नालाल सुराणायांच्या कार्याला अत्यंत प्रभावीपणे सहाय्य केले. व समाजकार्यामध्ये आपला वेगळा ठसा उमठविल्याचे दिसून येते. कौटूंबिक जबाबदारी सांभाळून समाजवादी पक्षवृध्दीचे कार्य, सामाजिक विषमता व स्त्री-पुरूषातील भेदाभेद नाहीसा करण्याचा त्यांचा प्रयत खूपच महत्वपूर्ण ठरतो. समाजवादी समाजपध्दती निर्माण करण्याचे त्यांचे ध्येय अत्यंत महत्वपूर्ण आहे.

## स्वातंत्र्योत्तर कार्य -

श्रीमती द्वारकाबाई देशपांडे या १९४३ साली कॉंग्रेस स्त्री संघटनेच्या प्रमुख अध्यक्षा होत्या. १९४७ मध्ये कॉंग्रेस कमिटीच्या आदेशानुसार त्यांनी कुरुक्षेत्रावरील निर्वासितांच्या शिबिरात सेवाशुश्रूषा करण्याचे कार्य केले. भारताच्या स्वातंत्र्यानंतरही द्वारका बाईंनी आपले समाजकार्य अत्यंत जोमाने सुरू ठेवले. १९५४ साली राष्ट्रविकास राष्ट्रविकास बालक मंदिर व १९७० साली इंदिरा कन्या प्रशाला स्थापन करुन सोलापुरातील मुलामुलींच्या शिक्षणाची सोय करून ठेवली. यामुळेच १९६६ साली त्यांना महाराष्ट्र राज्यातर्फे स्वातंत्र्यसैनिक म्हणून सम्मानपत्र व १९७२ साली केंद्रसरकारकडून ताम्रपट देवून त्यांचा सन्मान करण्यात आला.१५ ऑगस्ट १९७२ साली स्वातंत्र्यदिनाला २५ वर्ष पुर्ण झाले त्यादिवशी इंदिरा गांधीच्या हस्ते श्रीमती रमाबाईंना ताम्रपट देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. श्रीमती निलव्वाबाई धनशेट्टी यांनीहीसोलापूर मधील अनेक जनहितकारी योजानांसाठी उपोषण करून त्याची त्वरीत अमंलबजावणी करण्यास भाग पाडले. उपोषण व सत्याग्रह या दोन अहिंसक मार्गाचा वापर करून त्यांनी सोलापूरवाशीयांना अनेक सोई प्राप्त करून दिल्या. समाननागरीकत्व, अस्पृश्यता निवारण व चोख कारभार अशा अनेक बाबीसाठी त्यांनी कार्य केले व आपल्या पतीच्या निधनानंतरहीत्यांचे कार्य पुर्ण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

पद्मश्रीसुमती बाई शहायांनी आयुष्यभर जनमाणसांचे विशेषता जैन समाज व त्या समाजातील स्त्रियांसाठी त्यांनी काम केले. महिला भंडार, श्राविका भांडार, हौसिंग सोसायटी स्थापन करून सहकार व औद्योगिक क्षेत्रात कार्य केले. सोलापूर शहरामध्ये व्याख्यानमालेच्या, महिला संघटनांच्या माध्यमातून नेतृत्व केले. अखिल भारतीय जैन महिला परिषदेची स्थापणा केली व त्याच्याध्यक्षा झाल्या. त्याच्या माध्यमातून त्यांनी असेतू-हिमाचल प्रवास करून जागृतीचे कार्य केले. १९७२ साली भारतसरकारने त्यांच्या कार्याचा गौरव करू अण त्यांना "पद्मश्री" हा सन्मान दिला. हिराबाई गांधी यांनी स्वतंत्र्यानंतरच्याकाळातही कार्यकेले. कॉंग्रेसच्या शहराध्यक्षा म्हणूनही त्यांनी कार्य केले. स्वातंत्र्यानंतरच्या काळातही इंदिराबाई कृष्णाजीपंत अंत्रोळीकरयांनी अनेक संस्थांच्या माध्यमातून आपले समाजकार्य अत्यंत समर्पकपणे केले.

अशाप्रकारे सोलापूर जिल्ह्यातील महिलांनीसत्याग्रहात सहभाग नोंदवून 1930 चा मार्शललॉ,चले जाव चळवळ, मीठ सत्याग्रह ,बहिष्कार चळवळ, झेंडा सत्याग्रह आणि गिरणी आंदोलन अशा विविध चळवळींमध्ये सहभाग घेतला होता एवढेच नाही तर स्वतंत्र्यानंतरही विविध मार्गाने समाजसेवा करण्याचे कार्य सोलापूर जिल्ह्यातील महिलांनी केलेले दिसून येते.सोलापूर जिल्ह्याच्या स्वातंत्र्यलढ्यातील इतिहास, जो मार्शल कायद्यासाठी ओळखला जातो, त्यात या रणरागिणींचे योगदान कायम स्मरणात राहिले आहे.

## निष्कर्ष -

म. गांधीजीनी १९३० मध्ये सुरु केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत भारतीय महिलांनी अलौकिक कामगिरी केली. त्यात सोलापूर जिल्हयातील स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आपणास दिसून येतो. म. गांधीनी स्वातंत्र-चळवळीत सहभागी होण्यास सांगितले. आणि त्यांच्या या हाकेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला देशाच्या वेगवेगळ्या भागातून स्त्रियांनी उत्स्फूर्तपणे स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. सविनय कायदेभंग कायदेभंग चळवळीत सोलापूर जिल्हयातील मीठ सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, प्रभात फेरी वभाषणेयामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांचासहभागनोंदविला आहे.

स्वातंत्र्यापूर्वी सुरू झालेल्या चळवळीचा वारसा घेऊन वेगवेगळ्या क्षेत्रात आपले योगदान देण्याचे काम 21व्या शतकातही आताची पिढी वेगवेगळी नावे घेऊन करीत आहे. त्यामुळे विकासासाठी, प्रगतीसाठी वेगवेगळ्या, प्रश्नांवर आवाज उठविणे ही ताकद आहे. हीच ताकद चळवळ म्हणून उभी राहील. आजही अनेक प्रश्न बाकी आहेत. त्यासाठी सर्व जाती धर्मातील स्त्रियांना सोबत घेऊन सर्वसमावेशक अशी चळवळ उभी करण्याची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ सुची-


१. व्यं.गो. अंदूरकर, सोलापूर मार्शल लॉ आणि चार हुतात्मे
२. गोपाळ देशमुख, सोलापूरचा इतिहास
३. महाराष्ट्र शासन, स्वातंत्र्य सैनिकांचा चरित्रकोश
४. प्रा. डॉ.थोरे किशोर धोंडीबा, भारतातील स्वतंत्र चळवळीत सोलापूर जिल्ह्यातील महिलांचे योगदान
५. डॉ.एस. डी. खैरनार व प्रा.ए.एन.वळवी, सविनय कायदेभंग चळवळीत सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग सहभाग